# प्रेसनोट

**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 215/2022 दिनांकः 18.07.2022**

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**हदगाव :-**दिनांक 15.07.2022 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **मौजे आडा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन पोलीसात तक्रार का दिली व शेतीचे वाद करुन फिर्यादी व साक्षीदारास फावडे, लोखंडी रॉड व कोणतेतरी धारदार शस्त्राने वार करुन खुन करण्याचा प्रयत्न केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी विष्णु नथुराम जाधव, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. आडा ता. हदगाव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरन 215/2022 कलम 307,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री मोरे, मो. नं. 9763457266** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :-

**1)तामसा :-**दिनांक 15.07.2022 रोजी 23.15 वा. चे सुमारास, **श्रीकृष्ण मंदिर वायपना ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चार आरोपीतांनी श्रीकृष्ण मंदिराचे मुख्य दरवाज्याचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन त्या पैकी एका आरोपीने हातात दगड घेवून फिर्यादीचे डोक्यात मारुन दुखापत केली व मंदिरातील दानपेटीतील नगदी रुपये असा एकुण किंमती दहा ते अकारा हजार रूपयाचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी किशन धोंडिबा जमजळ, वय 70 वर्षे, व्यवसाय शेती रा. सावरगाव पिर ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 74/2022 कलम 394 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री किरवले, मो.क्रं. 9922101100** हे करीत आहेत.

**2)हदगाव :-**दिनांक 17.07.2022 रोजी 02.00 वा. ते 02.30 वा. चे दरम्यान, **बसवेश्वर चौक, हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चार आरोपीतांनी फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादीचे पत्नीचे तोंड दाबून फिर्यादीस व मुलास उठवून चाकूचा धाक दाखवून तिजोरीच्या व कपाटाच्या चाब्या घेवून त्यामधील सोन्या, चांदीचे दागीने रोख रक्कम, तिन मोबाईल असा एकुण किंमती 31,80,400/-रुपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी प्रमोद शंकरराव शेट्टी, वय 58 वर्षे, व्यवसाय शेती रा. बसवेश्वर चौक, हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 216/2022 कलम 394,452,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री शंकर पांढरे, मो.क्रं. 8180011000** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :-

**1)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 12.07.2022 रोजी 21.00 वा. ते दिनांक 16.07.2022 रोजी 21.00 वा. चे दरम्यान, **सुरेश इटापल्ले यांचे पदमजा सिटी फतेजंगपुर कौठा, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा भाऊ यांचे घराचे दरवाजाचे लॉक तोडुन आत प्रवेश करून घरातील हॉलमधील एल.ई.डी. किंमती 10,000/-रूपयाची व सी.सी.टी.व्ही. कॅमेराची डी.व्ही.आर. किंमती 5000/-रूपयाचा असा एकुण 15,000/- रुपयाचे सामान कोणतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अनिल रामराव इटापल्ले, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. बारुळ ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 431/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्र. 9158762002** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :-** दिनांक 16.07.2022 रोजी 19.00 वा. ते दिनांक 17.07.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **तेजस्विनी किराणा दुकान, श्रावस्तीनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा दुकानास कुलूप लावून सासू मरण पावल्याने नेरली येथे गेले होते तेंव्हा बंद दुकानाचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून गल्यात ठेवलेले एकुण नगदी 6000/-रूपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अशोक दिगांबर निखाते, वय 35 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. श्रावस्तीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 273/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/882 सुर्यवंशी, मो.क्रं. 9421870108** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :-

**विमानतळ :-** दिनांक 13.07.2022 रोजी 00.10 वा. ते दिनांक 13.07.2022 रोजी 10.30 वा. चे दरम्यान, **आसना ते शिवमंदीर रोड नालंदा पाटीच्या जवळ, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पलेंडर कपंणीची काळया व सिल्वर रंगाची मो.सा. क्रं. एम.एच.-26/बीझेड-3314 किंमती 67,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी आकाश अभंगराव शिंदे, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. नाथनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 248/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1334 जाधव, मो.क्रं. 8805859640** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**नांदेड ग्रामीण :—** डिसेंबर 2020 पासुन दिनांक 16.08.2021 रोजी चे दरम्यान, **तानुर जि. निर्मल राज्य तेलंगना ह. मु. जुना कौठा, नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस मोटार सायकल घेण्यासाठी माहेरहुन पन्नास हजार रुपये घेवून ये म्हणुन उपाशी पोटी ठेवून शिवीगाळ व मारहाण करून तिचा शारिरीक व मानसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 20 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 432/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्रं. 9158762002** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :—

**लिंबगाव :—** दिनांक 17.07.2022 रोजी 12.20 वा. चे सुमारास, **मौ. पोखर्णी शिवारातील राज धाब्या जवळ ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारु एकुण किंमती 1280/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/95 मुंजाजी अशोकराव चौरे, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 118/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री जहागीरदार, मो.क्र. 8767342530** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड